25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर
(प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in

जा. क्र. मनपा/सा.प्र./ ५१२/२०२६-२७ दि.२१/१०/२०२६

**विषय : नवरात्रौत्सव/ दुर्गामाता मुर्ती विसर्जन सुव्यवस्थित व चांगल्यारितीने पार पाडणेकरीता कामकाजाचे वाटप करणेबाबत.**

**संदर्भ : जा.क्र.मनपा/साबां/ विदयुत/शा.अ-३/४८६४/२०२६-२७ यांचे दि.०९/१०/२०२६ रोजीचे पत्र.**

## // आदेश //

मिरा-भाईंदर महानगरपालिका शहरामध्ये दि.११/१०/२०२६ ते दि.२०/१०/२०२६ कालावधीत नवरात्रोत्सवानिमित्त दुर्गामाता मुर्ती पुजन होणार असुन दि.२१/१०/२०२६ रोजी दुर्गामाता मुर्ती विसर्जन होणार आहे. दुर्गामाता मुर्ती विसर्जन सुस्थितीत, चांगल्या रितीने पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून विसर्जना करीता तयार करण्यात आलेल्या विसर्जन केंद्र ठिकाणी आवश्यकत्या उपायोजना करणेकामी दि.२१/१०/२०२६ विसर्जनाच्या दिवशी दुर्गामाता मुर्ती विसर्जन सुव्यवस्थित व चांगल्या रितीने पार पाडणेकरिता खालीलप्रमाणे अधिकारी यांना कामाचे वाटप करण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकाऱ्याचे नाव | सोपविण्यात आलेल्या कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता<br>बांधकाम विभाग | दुर्गामाता मुर्ती विसर्जनाच्या ठिकाणी विजेची व्यवस्था, विसर्जन ठिकाणी बैठक, मंडप, बॅनर, होर्डीग व निर्माल्य कलश याबाबत योग्य ती व्यवस्था करावी. तलावा ठिकाणी असलेले गेट बंद करण्याची व्यवस्था करावी.<br>तसेच रस्त्यातील खड्डे बुजविणे |
| २. | मुख्य अग्निशमन अधिकारी,<br>अग्निशमन विभाग | दुर्गामाता मुर्ती विसर्जन स्थळी आपल्या अग्निशमन दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्याची यांची नेमणूक करुन आवश्यक त्या लाईफ जॅकेट, इमर्जन्सी लाईट इत्यादी साहित्यासह विसर्जन पुर्ण होईपर्यंत विसर्जन ठिकाणी उपस्थित राहणे करीता आदेशित करावे. |
| ३. | जनसंपर्क अधिकारी<br>जनसंपर्क विभाग | नैसर्गिक व कृत्रिम तलावे यांची यादी व्यापक प्रमाणात प्रसिध्द करण्यात यावी. |
| ४. | कार्यकारी अभियंता,<br>पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग | विसर्जन स्थळी आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, टँकर पुरवठा तसेच पिण्याच्या पाण्याची वाटप व्यवस्थेकरिता आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात याव्यात. |

| | | |
|---|---|---|
| ५. | विभाग प्रमुख,<br>भांडार विभाग | नैसर्गिक तलावे व कृत्रिम तलावे येथे बॅनर प्रदर्शित करणेकरिता ते छपाई करुन सर्व प्रभाग समितीचे सहा.आयुक्त यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात यावे. |
| ६. | सिस्टीम ॲनालिस्ट<br>ई-टेंडरींग विभाग | दुर्गामाता मुर्ती विसर्जन स्थळी सी सी टिव्ही कॅमेरेचे नियोजन करण्यात यावे. |
| ७. | मुख्य उद्यान अधिक्षक<br>उद्यान विभाग | १. दुर्गामाता आगमन-विसर्जन मार्गातील तसेच विसर्जन स्थळाजवळील अवास्तव वाढलेल्या झाडांचो तात्काळ छाटणी करण्यात यावी.<br>२. मान्यवरांना पुष्पवृष्टी करण्यासाठी पुष्पकळयांची व्यवस्था करणे. |
| ८. | सहा. आयुक्त<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग | दुर्गामाता मुर्ती विसर्जन उत्तमरितीने पारपाडणेकरिता आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांची विसर्जन केंद्रावर नेमणूक करणे. |
| ९ | सहा. आयुक्त<br>प्रभाग समिती क्र. १ ते ६ | दुर्गामाता मुर्ती आगमन व विसर्जन उत्तमरितीने पारपाडणेकरिता आपल्या प्रभागातील फुटपाथ व रस्तेवरील सर्व फेरीवाले यांना हटविण्यात यावे. |

**(डॉ.सचिन बांगर)**
**अति.आयुक्त(सा.प्र.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रतमाहितीस्तव :**

१) मा. आयुक्त महोदय, मि.भा.मनपा

**प्रत कार्यवाहीस्तव :**

१) संबधित अधिकारी / कर्मचारी